क्र.:उविअ/अ.का./भूसंपादन/कावि- १२२ /२०२०
सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
कार्यालय, चांदुर रेल्वे दि. २८ / १२/२०२०.

## जाहिर आवाहन

महाराष्ट्र शासन, नगरविकास, मंत्रालय, मुंबई अधिसूचना क्र. टिपीएस-२६१७/प्र.क्र./२०१७(अ) नवि-३० दिनांक २३ एप्रिल, २०१८ अन्वये धामणगांव रेल्वे तालुक्यातील १) दत्तापूर (अंशत:क्षेत्र) २) जळगाव आर्वि (अंशत:क्षेत्र), ३) नारगावंडी (अंशत:क्षेत्र), ४) आसेगांव (अंशत:क्षेत्र) या गावाना नवनगर (कृषि समृध्दी केंद्र) घोषित केल्याची व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला नवनगर विकास प्राधिकरण म्हणून घोषित केल्याची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

त्यानुसार उपरोक्त गावातील अधिसूचीत क्षेत्र नवनगर (कृषि समृध्दी केंद्र) घोषित झाल्याचा प्रारंभिक दिनांक २३.०४.२०१८ असून या दिनांकास अस्तित्वात असलेल्या जमिनीशी निगडीत घटक तथा विकास कामे यांना नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे. प्रस्तुत दिनांकानंतर निर्माण केलेल्या कोणत्याही विकास कामास तथा जमिनीशी निगडीत घटकांना नुकसान भरपाई अनुज्ञेय ठरत नाही.

वरील नवनगरातील जमीन एकत्रीकरणाची प्रारंभिक अधिसूचना दिनांक २४/१२/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रस्तुत अधिसूचना प्रसिध्दी नंतर अनेक भूधारक त्यांचे जमिनीत मध्ये फळ झाडे लावणे, बांधकामे करणे, विहीर खोदकाम करणे, पाईपलाईन टाकणे इत्यादी प्रकारची विकास कामे करीत असल्याचे या कार्यालयाकडे तत्कालीन घटकांचे उपग्रहाद्वारे (Sattelite) टिपलेले छायाचित्र व त्यासंबंधिचे आवश्यक अभिलेखे या कार्यालयाकडे उपलब्ध आहेत. त्यानुसार दिनांक २३.०४.२०१८ रोजी अस्तित्वात असलेल्या जमिनीशी निगडीत घटकांना व विकास कामांना एकेरी नुकसान भरपाई मिळणार आहे. तद्नंतर नव्याने करण्यात आलेल्या विकास कामांना वा जमिनीशी निगडीत घटकांना कोणतीही नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस भूधारक व्यक्तीश: जबाबदार राहतील याची कृपया नोंद घेऊन सहकार्य करावे, ही विनंती.

दिनांक : 28/12/2020
स्थळ : चांदूर रेल्वे

**सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**चांदूर रेल्वे**